# नागपूर
# मोलकरणींची चळवळ



आज मोलकरीण ही मध्यमवर्गीय व सुस्थित समाजाची गरज होऊन बसली आहे. बहुतांश पांढरपेशीय घरातील स्त्रिया भांडी वा कपडे धुणे अप्रतिष्ठेचे समजतात. पूर्वी राजेमहाराजे आपल्या राण्यांसाठी दासी ठेवीत. या दासी राणीच्या वेशभूषेपासून तिची स्नान, भोजन आदी सर्वच बाबतीत जबाबदारी सांभाळीत. हीच प्रथा खाली सरदार, मालगुजार, जमीनदार यांच्या घरातही थोड्याफार फरकाने होती. शहरी भागातसुद्धा पांढरपेशे, व्यापारी, कारखानदार यांच्या स्त्रियांना मदतनीस म्हणून निम्न वर्गातील व वर्णातील स्त्रिया असत.

आज शहरी संस्कृतीचा अविभाज्य भाग बनलेल्या मोलकरणीसुद्धा या सरंजामी संस्कृतीचा अवशेष होय. मोलकरणीची गरज ही शहरातील उच्चवर्णीय नोकरदार तसेच व्यापारी, दुकानदार या वर्गातील कुटुंबांची गरज असल्याचे दिसून येते. जातिव्यवस्थेच्या रुपात पाहिले तर मोलकरणी लावणाऱ्या जाती या प्रामुख्याने ब्राह्मण, वैश्य, मराठा, कुणबी व प्रथम वा द्वितीय श्रेणीत असलेले दलित, आदिवासी इ.चा समावेश होतो. दुसरीकडे मोलकरणीचे काम करणाऱ्या स्त्रियांत प्रामुख्याने आदिवासी (गोंड, गोवारी इ.) तसेच गरीब तेली, कुणबी, धनगर (व नागपुरात वस्ती करून असलेल्या छत्तीसगडी लोकांपैकी अहीर, साहू, यादव इ. जातीतील) स्त्रिया प्रामुख्याने दिसून येतात. आश्चर्याची गोष्ट म्हणजे दलित स्त्रियांना अजूनही अपवादानेच मोलकरणीचे काम मिळते. खुद्द आदिवासी वा मध्यम जातीतील स्त्रियाच दलित स्त्रियांना मोलकरणीचे काम मिळू नये म्हणून घरमालकांकडे अशा स्त्रियांची जात सांगण्याचे काम करतात. आणि वरच्यांना हेच पाहिजे असते. स्त्रियांप्रमाणेच काही पुरुषही घरकाम करणारे असतात, विशेषत: मोठे दुकानदार, व्यापारी यांच्या घरात पुरुष भांडी-कपडे धुण्याचे काम करताना दिसतात.

डिसेंबर १९८१ मध्ये नागपूरला आमच्या मोलकरीण संघटनेचा जन्म झाला. धंतोली, काँग्रेसनगर, रामदास पेठ, बर्डी, जेलरोड आदी वस्त्यांत काम करणाऱ्या मोलकरणींची एक बैठक बोलावली होती. २० जणी बैठकीला उपस्थित होत्या. त्याच बैठकीत संघटनेसंबंधी जास्तीत जास्त स्त्रियांना सांगण्याचे ठरले. १६ डिसेंबरच्या बैठकीसंबंधी चक्रमुद्रित पत्र मोलकरणींना देण्यात आले. त्याचा परिणाम झाला. सुमारे १२५ मोलकरणी व ३–४ घरकाम करणारे पुरुष काँग्रेसनगर पार्कात जमा झाले. डॉ. बाबा आढाव अनायासे त्या दिवशी नागपुरात होते. तेही सभेला आले. पुण्यातील मोलकरीण संघटनेसंबंधी व एकूण मोलकरणींच्या प्रश्नांसंबंधी त्यांनी मार्गदर्शन केले. कोबाड गांधी व नागेश चौधरी यांनीही संघटनेच्या पुढील कार्यक्रमाविषयी सांगितले. संघटनेचे लोक आणखी वस्त्यांतून पसरले. सुस्थितांच्या वस्त्यांना जवळच्या

झोपडपट्टया आधी जाग्या झाल्या. उदा. तकीया, रामदास पेठ, गोंड वस्ती, जाटतरोडी, चुनाभट्टी इ. सुमारे २०० मोलकरणी संघटनेच्या सभासद झाल्या.

दिसामासी होणारी भाववाढ व वाढती आर्थिक कुचंबणा यांमुळे पगारवाढीची मागणी सर्वांना स्पर्शून गेली. घरमालकांना 'मोलकरणींचे आवाहन' या नावाचे छापील पत्रक वाटण्यात आले व पगारवाढीसाठी १४ व १५ जाने. रोजी संप करण्याचे ठरले. १४ तारखेस एक मोठा मोर्चा काढण्यात आला. सुमारे ४०० मोलकरणी मोर्चात सहभागी झाल्या. खुद्द तीळ-संक्रांतीच्या मुहुर्तावर मोलकरणींचा संप व मोर्चाच्या बातमीने पांढरपेशीय स्त्रिया व पुरुष न रागावते तरच नवल. मोर्चा व संपासंबंधी भिंती रंगविण्याचे कार्य खुद्द मोलकरणींनीच केले. १४ तारखेस पहाटेपासूनच झोपडपट्टयांची नाकेबंदी सुरू झाली. कुणी कामावर जाते का ? जाताना दिसली की तिला परतवणे, प्रसंगी जबरदस्तीने परत धाडणे असे प्रकार झालेत. कुणी पुरुष यात ढवळाढवळ करीत नव्हते. विरोधही नाही व पाठिंबाही नाही. मोर्चा आपल्या घरमालकांना दिसावा अशी बहुतेकांची अपेक्षा. धंतोलीमधून ११.३० वाजता सुरू झालेला मोर्चा काँग्रेसनगर, रहाटे कॉलनी, रामदासपेठ, बर्डी, अजनी, रेल्वे क्वार्टर्स इ. भागांतून सुमारे ५ तासपर्यंत घोषणा देत जात होता. दु. ४.३० वाजता मोर्चा विसर्जित झाला तेव्हा मोलकरणींच्या चेहऱ्यावर थकवा आणि अभिमान यांचे आगळे मिश्रण दिसत होते. 'पगारवाढ झालीच पाहिजे,' 'मोलकरीण संघटना झिंदाबाद,' 'मालिकराज मुर्दाबाद' या घोषणांबरोबरच ' गली गलीमें शोर है, बंगलेवाले चोर है ' ही खुद्द मोलकरणींनीच काढलेली घोषणा बरेच काही सांगत होती. तर काही मोलकरणी 'बंगलेवाले'च्या ठिकाणी ' बामनलोग ' असा शब्दप्रयोग करीत होत्या. वास्तविक पांढरपेशा वस्त्यांतून आता निव्वळपणे ब्राह्मण नाहीत. परंतु बंगलेवाले म्हणजे उच्चवर्णीय संस्कृतीवाले असा काहीसा त्यांचा समज झालेला असावा. कदाचित हे अनुभवातून सुचलेले शब्दप्रयोग असावेत.

दुसऱ्या दिवशीही सुमारे १२५ मोलकरणींचा मोर्चा विवेकानंद, समर्थ, रामकृष्ण इ. नगरांतून काढण्यात आला. संप सोडून कामावर गेलेल्या बायांना बंगल्यातून ओढून काढणे, मग मालकांनी घरात शिरणाऱ्यांना दरडावणे तर कधी घरचे कुत्रे त्यांच्या अंगावर सोडणे इ. प्रकारही घडून आले.

नागपूर शहरात मोलकरणींचा एवढा मोठा मोर्चा निघण्याची ही पहिलीच वेळ असावी. त्यामुळे मध्यम व उच्चवर्गीयांनी हेटाळणी करणे, फूट पाडणे, कामावरून कमी करणे असे प्रकारही अवलंबिले. परंतु मोलकरणी मात्र जिद्द कायम ठेवून आहेत. संप व मोर्चानंतर सुमारे ८० टक्के मोलकरणींना पगारवाढ झालेली आहे. कामावरून कमी केलेल्यांसाठी मोलकरणींनीच मध्यस्थी करून काम पुन्हा मिळवून देण्याचेही प्रकार घडले आहेत. बोनस, पगारी सुट्टया याही मागण्या संघटनेच्या कार्यक्रमात आहेत.

## मोलकरणी व आंतरराष्ट्रीय स्त्री-दिवस

नागपूरला मोलकरीण संघटनेच्या वतीने त्यांच्याच वस्त्यांतून आंतरराष्ट्रीय स्त्री-दिनाचे कार्यक्रम घेतले. तकीया या वस्तीत प्रामुख्याने आदिवासी आणि छत्तीसगडी लोक राहतात व दोन्ही प्रकारच्या स्त्रिया मोलकरणींचे काम करतात. १२ मार्चला झालेल्या या कार्यक्रमात लीला चितळे, पुष्पा चौधरी, अनुराधा गांधी यांची भाषणे झाली.

जाटतरोडी या वस्तीत गवळी व छत्तीसगडी (साहू यादव इ.) लोकांची वस्ती आहे व त्या सर्व प्रामुख्याने मोलकरणीचे काम करतात. या वस्तीत प्रमुख पाहुण्या सुगंधा शेंडे होत्या.

या वस्त्यांसाठी स्त्री-दिनाचा कार्यक्रम पहिल्यांदाच झाला. सावित्री फुले यांचा १० मार्च हा स्मृति-दिवस होता. त्यांच्याही जीवनकार्यावर वक्त्यांनी प्रकाश टाकला. झोपडपट्टीत केवळ स्त्रिया आपल्या समस्यांवर विचार करतात अशी ही पहिलीच वेळ होती. त्यामुळे सुरुवातीचा प्रतिसाद उत्साहजनक नव्हता, परंतु ऐन कार्यक्रमाच्या दिवशी अनेक स्त्रियांनी हिरिरीने भाग घेतला. काहींना आपल्या नवरोजींचा राग ओढवून घ्यावा लागला.

लेखिका – पुष्पा चौधरी, अनुराधा गांधी